# :- प्रेस नोट -:

कोल्हापूर जिल्हा पोलीस आस्थापनेवरील रिक्त असलेल्या ५९ पोलीस शिपाई चालक भरती प्रक्रियेतील शारिरीक चाचणी दि.२३.०६.२०२४ ते २८.०६.२०२४ या कालावधीत घेण्यात आली असून त्यामध्ये उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या आधारे ०१ : १५ प्रमाणात वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. उमेदवारांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी दि.०३.०७.२०२४ ते ०८.०७.२०२४ अखेर मेरी वेदर क्रिडांगण, नागाळा पार्क, कसबा बावडा रोड, कोल्हापूर या आयोजित करण्यात आलेली आहे.

दिनांक ०३.०७.२०२४ ते ०८.०७.२०२४ या कालावधीत वेगवेगळया पदांकरीता इतर घटकात मैदानी चाचणी, तांत्रिक अडचण, लेखी परिक्षा व इतर कारणास्तव जे उमेदवार वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणीकरिता उपस्थित राहु शकले नाहीत, अशा उमेदवारांना वाजवी संधी म्हणून दि.०९.०७.२०२४ रोजी अंतिम तारीख देण्यात येत आहे. उमेदवारांनी आवश्यक त्या सबळ पुराव्यासह वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणीकरिता मेरी वेदर क्रिडांगण, नागाळा पार्क, कसबा बावडा रोड, कोल्हापूर या ठिकाणी सकाळी ०६.०० वाजता वेळेत उपस्थित रहावे.

दिनांक ०९.०७.२०२४ ही कोल्हापूर जिल्हा पोलीस शिपाई चालक भरती-२०२२-२३ मधील वाहन चालविण्याचे कौशल्य चाचणीची अंतिम तारीख असून या तारखेनंतर येणा-या उमेदवारांची विनंती विचारात घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(महेंद्र क.पंडित,भा.पो.से)
पोलीस अधीक्षक,कोल्हापूर

ठिकाण :- कोल्हापूर
दिनांक :- ०५.०७.२०२४

प्रति,

संपादक, दैनिक ---------------------

०२/- नमुद प्रेसनोट ही दिनांक ०६.०७.२०२४ रोजीचे आपले दैनिकामध्ये जनहितार्थ विनामुल्य प्रसिध्द करण्यात यावी,हि विनंती.

प्रत :-

प्रभारी अधिकारी,सायबर पोलीस ठाणे

०२/- सदरची प्रेस नोट कोल्हापूर जिल्हा पोलीस दल व पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसारित करणेबाबतची आवश्यक ती कार्यवाही करावी.